महाराष्ट्र शासनाचा २०१४-२०१५ या वर्षाचा
अंतरिम अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# श्री. अजित पवार

## उपमुख्यमंत्री (वित्त)

यांनी मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ रोजी
केलेले भाषण

*

अध्यक्ष महाराज,

मी आपल्या अनुमतीने सन २०१४-१५ या वर्षाचा राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

सन्मानीय सदस्यांना हे माहीत आहे की, लवकरच देशात लोकसभेच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनात ४ महिन्यांच्या लेखानुदानास मंजूरी देण्यात आली आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर केंद्र सरकार पूर्ण अर्थसंकल्प सादर करील. या पार्श्वभूमीवर मी आपल्या अंतरिम अर्थसंकल्पाव्दारे लेखानुदानाचा प्रस्ताव सन्मानीय सभागृहासमोर सादर करीत आहे. यामध्ये राज्य शासनाचा स्थायी खर्च आणि चालू असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी पुढील आर्थिक वर्षातील ४ महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या खर्चाची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पुढील अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. त्यामध्ये योजनेतर आणि योजनांतर्गत नवीन बाबींवरील खर्चाचा समावेश होईल.

मी आपणास सांगू इच्छितो की, गेल्या १५ वर्षांपासून आमच्या सरकारवर जनतेने दाखविलेला विश्वास सार्थकी लावण्याचे अविरत प्रयत्न आम्ही करीत आहोत. सरकारच्या या प्रयत्नांची फलश्रुती म्हणजे राज्याने सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आघाडीवर मोठ्या प्रमाणात प्रगती साधल्याचे दिसून येत आहे. त्या सर्व बाबींचा उल्लेख न करता काही ठळक बाबींचा उल्लेख मी करीन. गेल्या दशकात राज्यातील दरडोई उत्पन्नात २४ हजार ३५ रुपयांवरुन १ लाख ५ हजार ४९३ रुपयांपर्यंत घसघशीत वाढ झाली. ऊर्जा उत्पादनात आपण ६४ हजार १३८ दशलक्ष किलोवॅट तास वरुन ८९ हजार ४६५ दशलक्ष किलोवॅट तास पर्यंत मजल मारली. साक्षरता दरात ७६.९ टक्क्यावरुन ८२.९ टक्के वाढ झाली. जन्मदर २१ वरुन १६.७, मृत्युदर ७.५ वरुन ६.३; तर अर्भक मृत्युदर ४८ वरुन २५ इतका खाली आला आहे.

देशाच्या आर्थिक विकास दराने २००६ ते २०११ या कालावधीत वेग धरला होता, हे आपल्याला माहित आहेच. पण नंतरच्या काळात एकंदरीत जागतिक मंदीचा परिणाम देश आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झाला. त्याचा परिणाम काही अंशी राज्याच्या उत्पन्नवाढीवरही होतो आहे. तरीही शेतकरी, शेतमजूर, महिला, अल्पसंख्यांक आणि दुर्बल घटकांच्या कल्याणकारी योजनांसाठी प्रस्तुत अर्थसंकल्पात मी भरीव तरतूद ठेवून, या घटकांना पुरेसा न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे, हे आपल्या लक्षात येईल.

राज्याच्या आणि जनतेच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न सरकार करीत आहेच. तथापि अन्न, रोजगार, निवारा आणि आरोग्य या विषयांवर अधिक भर देण्याचा; तसेच या माध्यमातून राज्याच्या जनतेला मोठा दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना

१. राज्यात दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना लागू करण्यात आली आहे. राज्याच्या ग्रामीण भागातील ४ कोटी ७० लाख आणि शहरी भागातील २ कोटी ३० लाख असे एकूण ७ कोटी लाभार्थी या योजनेंतर्गत सवलतीच्या दरात धान्य मिळण्यास पात्र आहेत. या योजनेनुसार अंत्योदय योजनेखाली लाभ घेत असलेल्या सर्व कुटुंबाना ३५ किलो धान्याचे वाटप चालू राहील; तर प्राधान्य कुटुंबातील सदस्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमहा ५ किलोप्रमाणे धान्य मिळेल.

१.१ राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळू न शकणाऱ्या सुमारे १ कोटी ७७ लाख पात्र शिधापत्रिकाधारक लाभार्थींना पूर्वीप्रमाणेच सवलतीच्या दराने अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

१.२ साखर कारखान्यांवरील लेव्हीचे बंधन आणि नियंत्रण प्रक्रिया हटविल्याने वितरणासाठी नियंत्रित दराने कारखान्यांकडून साखर उपलब्ध होणार नसली तरी, शासनाने लाभार्थींना पूर्वीच्याच सवलतीच्या दरात, म्हणजेच १३ रुपये ५० पैसे प्रति किलोप्रमाणे साखर उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. विक्रीची किंमत आणि केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान वजा जाता उर्वरित आर्थिक भार राज्य शासन उचलणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली सक्षमरित्या चालविण्यासाठी २०१४-१५ ह्या वर्षी भांडवली खर्चासाठी २ हजार २५३ कोटी रुपये व तूट भरुन काढण्यासाठी ७६१ कोटी ४८ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

१.३ मला खात्री आहे की, अत्यंत महत्वाकांक्षी आणि जगात अद्वितीय असलेल्या या योजनेमुळे राज्यात कोणाही व्यक्तीवर उपाशीपोटी राहण्याची वेळ येणार नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि राज्य रोजगार हमी योजना

२. राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षात या योजनेद्वारे ४ हजार ५०० कोटी रुपये खर्च होऊन १ हजार ८१० लाख मनुष्य दिवस रोजगार निर्माण झाला आहे.

२.१ राज्य रोजगार हमी योजनेतील जवाहर आणि धडक सिंचन कार्यक्रमांतर्गत १ लाख ४३ हजार ४५० विहिरी पूर्ण झाल्या आहेत. २४ हजार ५२० विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. या विहिरी पूर्ण करण्यासाठी अनुदानाची रक्कम १ लाख रुपयांवरुन २ लाख ५० हजार रुपये इतकी नुकतीच वाढविली आहे. सन २०१४-१५ साठी २५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

२.२ 'क' वर्ग नगरपरिषदांमध्ये राज्य रोजगार हमी योजनेतून कामे घेणे, सक्षम पाणलोट विकास क्षेत्रांवर भर, ई-मस्टरचा वापर, तक्रार निवारण प्रणाली, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मजुरांच्या खात्यात मजूरी जमा करणे आणि त्यांना वेतन चिठ्ठी देणे अशी पावले मजूरांच्या हितासाठी उचलण्यात आली आहेत.

व्यवसाय शिक्षण अंतर्गत कौशल्य विकास कार्यक्रम

३. विद्यार्थी, प्रशिक्षणाची संधी उपलब्ध नसलेले गट, अशिक्षित, प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आणि शालेय शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय तंत्र माध्यमिक शाळांमधून रोजगाराभिमुख कौशल्य देण्याचे प्रस्तावित आहे. अशा प्रशिक्षणाच्या सहाय्याने प्रशिक्षणार्थींना कौशल्य प्राप्त करुन घेऊन अर्थार्जन करणे शक्य होईल.

३.१ व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेतल्यास रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी शोधणे अधिक सोपे जाते, याची पूर्ण जाणीव शासनास आहे. म्हणूनच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व आर्थिक मागास प्रवर्गातील मुला-मुलींना या संधी प्राप्त करुन देण्यासाठी शासनामार्फत शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविल्या जातात. या योजनांचा फायदा दरवर्षी अंदाजे ५ लाख विद्यार्थ्यांना होतो.

गरिबांसाठी घरे

४. इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१३-१४ पासून शासनाने घरकुलाची सुधारीत किंमत १ लाख रुपये केली आहे. परिणामी लाभार्थींना चांगल्या प्रतीचे घरकुल बांधणे शक्य होत आहे. या योजनेअंतर्गत सन २००३-०४ ते २०१२-१३ या कालावधीत ११ लाख ८३ हजार ९५३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी १ लाख ८२ हजार ६६३ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय दारिद्र्यरेषेखालील बेघर आदिवासींना सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत घरे देण्याचा मानस असून त्यासाठी निधी राखून ठेवण्यात आला आहे.

४.१ नागरी आणि ग्रामीण भागात अनुसूचित जाती व नवबौध्दांसाठी रमाई आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आजवर ग्रामीण भागात १ लाख ३५ हजार ५४३ तर शहरी भागात ५ हजार ३७२ इतकी घरकुले बांधण्यात आली आहेत. सन २०१४-१५ साठी एकूण ३३३ कोटी ३९ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

शहरी गरिबांना मुलभूत सुविधा; तसेच एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम

५. शहरी गरिबांना मुलभूत सुविधा; तसेच एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने आतापर्यंत ८ हजार ३६२ कोटी ९६ लाख रुपये प्रकल्प किंमतीची २ लाख ४७ हजार ७६८ घरकुले मंजूर केली आहेत. त्यापैकी ८५ हजार १९१ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ४८ हजार ६१ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सन २०१४-१५ साठी ६७५ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना

६. दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना २१ नोव्हेंबर २०१३ पासून संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील अंदाजे २ कोटी ११ लाख कुटुंबाना या योजनेचा लाभ मिळेल. आतापर्यंत ३५ जिल्ह्यातील ४०६ रुग्णालये या योजनेशी संलग्न करण्यात आली आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या ९७१ आजारांवरील उपचार आणि १२१ पाठपूरावा सेवा या योजनेद्धारे दिल्या जात आहेत. आतापर्यंत दिड लाखांपेक्षा जास्त रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला असून सन २०१४-१५ साठी ६९८ कोटी ५७ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

आपत्कालिन वैद्यकीय सेवा

७. कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने वैद्यकीय सेवा मिळाल्यास ९० टक्के प्रकरणांमध्ये आपदग्रस्तांचे प्राण वाचू शकतात. या हेतूने राज्यात आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यास शासनाने सुरुवात केली आहे. एकूण ९३७ रुग्णवाहिकांमधून २४ तास डॉक्टरांची कुमक व अत्याधुनिक जीवरक्षक साधनसामुग्री उपलब्ध होणार आहे. सद्य:स्थितीत ९ जिल्ह्यात १५६ रुग्णवाहीका दिनांक २६ जानेवारी २०१४ पासून प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

कृषी विकास

८. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि शेतीच्या वृद्धीसाठी शासन कटीबद्ध आहेच. सूक्ष्म सिंचन, फलोत्पादन, अन्न प्रक्रिया, उत्पादकता वाढ यासारख्या केंद्र पुरस्कृत योजनांना आवश्यक पूरक हिस्सा प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कोरडवाहू शेती अभियान, सर्वंकष पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण, शेतकऱ्यांमध्ये कौशल्यवृध्दी अशा अनेक योजनांच्या माध्यमातून राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष प्रयत्नशील आहे. अन्नधान्य उत्पादकतेबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी पाणलोट विकास, फलोत्पादन, प्रक्रिया उद्योग, एकात्मिक पीक पद्धती, तंत्रज्ञान प्रसार, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या योजनांची एकत्रित मांडणी करुन शाश्वत शेतीवर भर देण्यात येत आहे. सदर उपक्रमांसाठी आवश्यक असणारा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण

९. राज्यात वारंवार उद्‌भवणारी दुष्काळसदृश परिस्थिती विचारात घेता, जलसंवर्धन योजनेला अनन्यसाधारण महत्व आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अथवा राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत शेततळ्यांच्या प्लास्टिक अस्तरीकरणासाठी केंद्र शासन ५० टक्के अनुदान देते. या व्यतिरीक्त राज्य शासन २५ टक्के; २५ हजार रुपयांच्या मर्यादेत वाटा उचलणार आहे. २०१४-१५ पासून प्लास्टिक अस्तरीकरण करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येईल. ही योजना १० हजार शेततळयांचे भौतिक उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत लागू राहील.

जलसिंचन प्रकल्प

१०. सन २०१४-१५ साठी जलसंपदा विभागाकडील पाटबंधारे प्रकल्पांसाठी ८ हजार २१५ कोटी ७० लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. त्यातून सुमारे १.२५ लाख हेक्टर सिंचन क्षमता आणि सुमारे १००० दशलक्ष घन मीटर पाणीसाठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. या वर्षात सुमारे ६० प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान

११. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत मंजूर कामे पूर्ण करण्याकरिता सन २०१४-१५ साठी १३३ कोटी ५० लाख रुपये आणि नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटुंबियांना खाजगी नळ जोडणी; तसेच वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ३६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

जलस्वराज्य प्रकल्प टप्पा - २

१२. भौतिक उद्दिष्टे आणि साध्यांना महत्व देणारी संरचना असणारा 'जलस्वराज्य-२' हा कार्यक्रम देशात सर्व प्रथम आपल्या राज्यात राबविण्यात येत आहे. जागतिक

बँकेच्या सहाय्याने हा कार्यक्रम राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या कार्यक्रमाचा कालावधी ६ वर्षे असणार आहे. कार्यक्रमाची अंदाजित किंमत १ हजार २८४ कोटी ३१ लाख रुपये आहे. त्यापैकी ८९९ कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून आणि उर्वरित ३८५ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च राज्य शासन; तसेच लोक वर्गणीद्वारे करण्यात येणार आहे. सन २०१४-१५ साठी १५० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना

१३. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती आणि नवबौध्द समाजाच्या प्रत्येक कुटुंबाला शौचालय बांधण्याकरिता ११ हजार रुपये; तर घरगुती नळजोडणीसाठी ४ हजार रुपये अनुदान देण्यात येते. ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता या योजनेसाठी २०१४-१५ साठी ६० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान

१४. पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत लोकसहभागाद्वारे नियोजन करुन राज्याच्या ग्रामीण क्षेत्राचा जलद, संतुलित आणि शाश्वत विकास साधणे हे राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २०१४-१५ साठी या अभियानाच्या केंद्र हिश्श्याकरिता १६५ कोटी २५ लाख रुपये आणि राज्य हिश्श्यापोटी २५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मागासक्षेत्र अनुदान निधी

१५. मानव विकास निर्देशांकावर आधारीत १२ मागास जिल्ह्यांची निवड करुन या जिल्ह्यांसाठी मागास क्षेत्र अनुदान निधीतून अनेक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या योजनेसाठी सन २०१४-१५ साठी ३९५ कोटी ७१ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापना आणि तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रम

१६. तंत्रशास्त्र आणि व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राज्यात महाराष्ट्र तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेकरिता सन २०१४-१५ साठी १० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे; तसेच तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रमासाठी सन २०१४-१५ करिता १३० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना आणि शिष्यवृत्ती

१७. न्यायमूर्ती सच्चर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आधुनिक आणि मुख्य प्रवाहातील शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेंतर्गत नोंदणीकृत मदरशांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान दिले

जाईल. मदरशांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी आणि ऊर्दू विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मानधनासाठी; तसेच मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी देखील अनुदान देण्यात येईल.

१७.१ अल्पसंख्यांक लोक समुहातील उमेदवारांना नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने मौलाना आझाद मोफत शिकवणी व संबध्द योजना सुरु केली आहे.

१७.२ अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. याकरिता केंद्र आणि राज्य हिस्सा मिळून सन २०१४-१५ साठी ८१ कोटी ४४ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्र विकास योजना

१८. अल्पसंख्यांकबहुल ग्रामीण क्षेत्र विकास योजनेंतर्गत ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्यांक लोकसमूहातील नागरीकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी अल्पसंख्यांकबहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याकरीता सन २०१४-१५ साठी ४० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

१९. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी इयत्ता ९ वी आणि १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारने मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. सदरहू योजना राज्यात सन २०१३-१४ पासून लागू करण्यात आली आहे. यासाठी सन २०१४-१५ करीता १३६ कोटी ५३ लाख इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

अंगणवाडी सेविका व मदतनीसांना एकरकमी सेवानिवृत्ती लाभ

२०. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका सेवानिवृत्त झाल्यास त्यांना अथवा मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसांना १ लाख रुपये; तर मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस निवृत्त झाल्यास त्यांना अथवा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना ७५ हजार रुपये आयुर्विमा महामंडळाच्या योजनेंतर्गत एकरकमी लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; तसेच अंगणवाडीसेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीसांना मानधनात भरीव वाढ करण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे.

**सुकन्या योजना**

२१. स्त्रीभ्रूणहत्या रोखणे आणि मुलांइतकाच मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींचे शिक्षण व आरोग्य यामध्ये सुधारणा, बालविवाह रोखणे, मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक तरतूद, ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी सुकन्या योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेनुसार राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबात जन्मलेल्या प्रत्येक मुलीच्या नांवे २१ हजार २०० रुपये आयुर्विमा महामंडळाच्या योजनेत गुंतविले जातील. ही मुलगी १८ वर्षाची होईल तेव्हा १ लाख रुपये मिळतील. तिला आम आदमी विमा योजना व शिक्षा सहयोग योजनांचेही लाभ मिळतील. याकरीता सन २०१४-१५ साठी १८७ कोटी ७१ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**मनोधैर्य योजना**

२२. लैंगिक अत्याचारास किंवा ॲसिड हल्यातील पीडित महिला, तसेच बालकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने मनोधैर्य योजना सुरु केली आहे. या योजनेखाली पीडितांना २ ते ३ लाख रुपये आर्थिक सहाय्य आणि ५० हजार रुपयांपर्यंत प्रासंगिक खर्च अनुज्ञेय आहे; पीडितांना निवारा, वैद्यकीय आणि कायदेशीर मदत, समुपदेशन आणि मनोवैज्ञानिकांची मदत देण्याचीही तरतूद आहे. याबाबत त्वरीत निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकार देण्यात आले आहेत. याकरिता सन २०१४-१५ साठी १५ कोटी १० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**समुपदेशन केंद्र**

२३. महिलांवर आणि बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करुन त्यांना संरक्षण; तसेच मदत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने ३५ जिल्ह्यांमधील प्रत्येकी ३ संवेदनशील तालुक्यांकरिता एक याप्रमाणे १०५ समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत एकूण ८७ समुपदेशन केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रांतील समुपदेशक आणि समन्वयक यांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे.

**स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यक्रम**

२४. महिलांनी स्वत:चे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने राज्यातील विद्यार्थिनी, गृहिणी आणि नोकरदार महिलांना स्वयंसिद्धा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सहकारी पत संस्थांमधील ठेवी परत करण्यासाठी अर्थसहाय्य**

२५. आर्थिक अडचणीतील सहकारी पतसंस्थांमध्ये ठेवीदार असलेल्या उपवर मुलींच्या पालकांना ठेवी परत करण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अशा ठेवीदारांच्या १ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी परत करण्यासाठी बिनव्याजी कर्ज सहाय्याकरिता ६ कोटी ४ लाख रुपयांचा निधी चालू वर्षी मी उपलब्ध करुन दिला आहे.

औद्योगिक विकास

२६. देशभरातून केंद्र शासनाकडे सादर झालेल्या औद्योगिक प्रस्तावांमध्ये महाराष्ट्र हे सर्वाधिक प्रस्ताव असणारे आणि सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. चालू वर्षात ९ हजार ७२५ कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या २५ नवीन विशाल प्रकल्पांना राज्यात मंजुरी देण्यात आली आहे. औद्योगिक प्रोत्साहनाकरिता सन २०१४-१५ मध्ये २ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

भारनियमन

२७. विजेच्या एकूण मागणीपैकी राज्यात ९७ टक्के मागणीची पूर्तता होते आहे. सर्व औद्योगिक फिडर आणि ८४ टक्के इतर वीज ग्राहक भारनियमनमुक्त करण्यात आले आहेत.

वीज दरात सवलत.

२८. महावितरणच्या घरगुती, वाणिज्य, औद्योगिक; तसेच यंत्रमागधारक ग्राहकांना वीज दरांत साधारणत: २० टक्के सवलत देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यामुळे मीटर असलेल्या कृषिपंपधारकांना वीज दरांत ४८ ते ६५ पैसे प्रतियुनिट आणि मीटर नसलेल्या कृषिपंपधारकांना प्रतिअश्वशक्ती दरमहा २८ ते ६० रुपये सवलत मिळेल. वीज दरात सवलतीसाठी सन २०१४-१५ साठी ९ हजार कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

रस्ते विकास

२९. राज्यात आतापर्यंत २ लाख ४२ हजार ९१९ किलोमीटर लांबीचे रस्ते विकसित करण्यात आले आहेत. त्यापैकी ६५ टक्के रस्त्यांचे डांबरीकरण झाले आहे.राज्यातील रस्ते विकासासाठी सन २०१४-१५ साठी २ हजार ८३६ कोटी ६७ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. त्याअंतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासाठी १२० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मिहान प्रकल्प

३०. नागपूर येथील मिहान प्रकल्प विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा प्रकल्प २ हजार ५८१ कोटी रकमेचा असून, डिसेंबर २०१३ पर्यंत एकूण २ हजार ९६४ हेक्टर खाजगी जमीन प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आली आहे. राज्य शासनाने या प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता डिसेंबर, २०१३ पर्यंत ४७८ कोटी ८९ लाख रुपये निधी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीसाठी वितरीत केला आहे. या प्रकल्पामध्ये टिसीएस, इन्फोसिस, टेक महिंद्रा आणि विप्रो सारख्या नामांकीत सॉफ्टवेअर कंपन्यांची बांधकामे सुरु आहेत. सिप्ला या औषध निर्मीती कंपनीची उभारणी पूर्ण झाली असून त्यांचे उत्पादनही आता सुरु होते आहे. या कंपन्यांच्या

माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. मिहान प्रकल्पाच्या भूसंपादन आणि प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरीता सन २०१४-१५ साठी २५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

विमानतळ विकास

३१. उद्योग आणि व्यापारवाढीस चालना देण्यासाठी राज्यात विमानतळांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. कराड, अमरावती, जळगाव, अकोला, सोलापूर आदी ठिकाणी विमानतळांची कामे प्रगतिपथावर आहेत. शिर्डी येथील विमानतळ कार्यान्वित होण्याच्या अंतिम टप्प्यावर आहे. विमानतळांचा विकास, देखरेख आणि देखभालीसाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता १६५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

नवी मुंबई विमानतळ

३२. नवी मुंबई येथे सिडकोच्या माध्यमातून दरवर्षी ६ कोटी प्रवासी क्षमता असलेला देशातील सर्वात मोठा विमानतळ उभारण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक सर्व प्रकारच्या परवानग्या संबंधित विभागाकडून घेण्यात आल्या आहेत. जमिन संपादनाबाबत तोडगा काढण्यात आपल्याला यश आले आहे. पहिल्या टप्यात १ कोटी प्रवासी हाताळण्याचे उद्दीष्ट असून ते २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प

३३. पी. डिमेलो मार्गावरील एस. व्ही. पटेल जंक्शन ते शीव - पनवेल रस्त्यावरील पांजरपोळ जंक्शनपर्यंतचा "पूर्व मुक्त मार्ग" दिनांक १४ जून २०१३ पासून; तर मिलन रेल्वे ओलांडणी पूल २४ मे २०१३ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. सहार उन्नत मार्गाचे कामही पूर्ण झाले असून तो वाहतुकीसाठी नुकताच खुला करण्यात आला आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प मेट्रोमार्ग-१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर

३४. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा ११.४० किलोमीटरचा उन्नत मार्ग पूर्ण झाला असून तो लवकरच कार्यान्वित होईल. २ हजार ३५६ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचा लाभ ६ लाख प्रवाशांना होईल.

मुंबई मोनोरेल प्रकल्प

३५. भारतातील पहिला २० किलोमीटर लांबीचा मोनोरेल प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे उभारला जात आहे. त्यापैकी वडाळा ते चेंबूर हा पहिला टप्पा १ फेब्रुवारी २०१४ रोजी कार्यान्वित झाला आहे. त्यास मुंबईकरांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. संत गाडगे महाराज चौक ते वडाळा या दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर आहे. या टप्प्याच्या पूर्ततेकरता आणखी दीड वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा एकूण खर्च २ हजार ४६० कोटी रुपये असून तो पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर प्रतिदिन किमान १ लाख ८० हजार प्रवाशांना त्याचा लाभ होईल.

**पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प**

३६. पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्पामधील पहिल्या टप्प्यांतर्गत, पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिका क्रमांक-१ चा आणि वनाझ ते रामवाडी मार्गिका क्रमांक-२ चा समावेश आहे. मार्गिका क्रमांक-१ साठी ६ हजार ९६० कोटी रुपये व मार्गिका क्रमांक-२ साठी ३ हजार २२३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. याशिवाय पिंपरी ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज या १५ किलोमीटर लांबीच्या वाढीव मेट्रो मार्गिकेस तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी तसेच अर्थसहाय्य मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

**नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प**

३७. नागपूर महानगर क्षेत्रात ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान आणि प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर या एकूण सुमारे ३८ किलोमीटर लांबीच्या २ मेट्रो रेल्वे मार्गिकांच्या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी ८ हजार ६८० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाचा सुधारीत प्रकल्प अहवाल मान्यता आणि अर्थसहाय्य मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान**

३८. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत केंद्र शासनाने १४ हजार ४२८ कोटी ६९ लाख रुपयांचे ११४ प्रकल्प मंजूर केले आहेत. प्रकल्प मंजुरी आणि निधी मिळवण्याच्या बाबतीत महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत अग्रेसर आहे. सन २०१४-१५ साठी १ हजार ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

३८.१ लहान आणि मध्यम शहरांच्या नागरी पायाभूत सोयी-सुविधांच्या विकास कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय समितीने सुमारे ३ हजार ५०० कोटी रुपयांचे ४५ नवीन प्रकल्प मंजूर केले आहेत. या प्रकल्पांचे प्रस्ताव केंद्र शासनाची मान्यता आणि निधीसाठी पाठविले होते. डिसेंबर २०१३ अखेर त्यापैकी १७ प्रकल्पांना केंद्र सरकारने मंजूरीही दिली असून त्यातील प्रकल्प मुख्यत: पाणी पुरवठा आणि मलनि:सारणाशी संबंधीत आहेत. सन २०१४-१५ साठी याकरीता १०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान**

३९. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत काही निवडक शहरांमधील ४१ मंजूर प्रकल्पांकरिता सन २०१४-१५ साठी ४५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

पोलीस दलाकरीता नवीन पद निर्मिती

४०. राज्य पोलीस दलाकरिता पाच वर्षांत पाच टप्प्यांत ६१ हजार ४९४ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यांत १२ हजार ३७९ पदे निर्माण करण्यात येतील. त्यासाठी अंदाजे ५६६ कोटी रुपये वाढीव आवर्ती खर्च येईल. त्याचबरोबर राज्य सुरक्षा आयोग आणि पोलीस तक्रार प्राधिकरणासाठी १३३ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांच्या भत्यात वाढ

४१. सणासुदीच्या काळात आणि संवेदनशील प्रसंगी राज्याची कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गृह रक्षक दल आणि नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवक मदतीची भूमिका पार पाडत असतात. शासनाने नुकतीच त्यांच्या उपस्थिती भत्त्यात दुपटीने वाढ केली असून इतर भत्यातही भरीव वाढ केली आहे.

८० वर्षावरील निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतनात वाढ

४२. राज्य शासन, जिल्हा परिषदा, अनुदानित कृषी आणि कृषेत्तर शैक्षणिक संस्थांतून निवृत्त झालेल्या ८० वर्षावरील निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना ६व्या वेतन आयोगानुसार मिळत असलेल्या निवृत्ती वेतनात १० टक्क्याने वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास भागभांडवल

४३. पिंपरी-चिंचवड औद्योगिक वसाहतीत महाराष्ट्र माजी सैनिक औद्योगिक वसाहत उभारण्यात येत आहे. त्याकरिता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास १० कोटी रुपये भागभांडवल देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

रामटेक गडमंदिर विकास

४४. नागपूर जिल्ह्यातील सुप्रसिध्द पुरातन रामटेक गडमंदिर देवस्थान परिसराचा विकास करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम

४५. प्रतिपंढरपूर म्हणून ओळख असलेल्या जळगांव जिल्ह्यातील अमळनेर येथील श्रीसंत सखाराम महाराज समाधीस्थळ आणि विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसराच्या विकासासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

पर्यटन विकास

४६. औरंगाबाद जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरुळ, खुल्ताबाद, सुलीभंजन पर्यटनस्थळांच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

४६.१ छत्रपती संभाजीराजे यांनी बांधलेल्या पद्मदुर्ग, तालूका मुरुड, जिल्हा रायगड या किल्ल्यावर पर्यटकांना जाण्या-येण्यासाठी, तरंगती जेट्टी बांधण्याचा व तळा जिल्हा रायगड येथील प्राचिन बौद्ध लेणी सुशोभीकरण आणि पर्यटकांसाठी सोई-सुविधा पुरविण्याचा आमचा मानस आहे. रायगड जिल्ह्यातील या पर्यटन विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

माहिती तंत्रज्ञान

४७. ३५ हजारापेक्षा जास्त महा-ई-सेवा केंद्रांच्या माध्यमातून आतापर्यंत १८ कोटी पेक्षा जास्त ई-व्यवहार झाले आहेत. ई-निविदांद्वारे आतापर्यंत ४१ हजारापेक्षा जास्त निविदा काढल्या आहेत. सर्व संकेतस्थळांचे मुखपृष्ठ मराठीमध्येच असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

४७.१ माहिती तंत्रज्ञान संचालनालयातर्फे नागरिकांना विविध ॲप्लिकेशन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. " जीआर सर्च " हे ॲप्लिकेशन १० हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी डाऊनलोड केले आहे.

मराठी भाषा विकास

४८. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल केंद्र सरकारला पाठविण्यात आला आहे. त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे. मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी शासनामार्फत विविध अभिनव योजना राबविण्यात येत आहेत. मराठी भाषा विकासाकरिता सन २०१४-१५ साठी १५ कोटी ६० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन व भूसंपादन

४९. राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य परिसरातील गावांच्या पुनर्वसनासाठी, उदाहरणार्थ सह्याद्री व्याघ्रप्रकल्प, राधानगरी, पेंच, टिपेश्वर अभयारण्यातील गावांचे पुनर्वसन आणि माळढोक पक्षी अभयारण्यातील जमीन भूसंपादनाकरीता सन २०१४-१५ साठी ३५ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

सिंहस्थ कुंभमेळा

५०. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सन २०१५-१६ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. त्यासाठी २ हजार ३७८ कोटी ७८ लाख रुपयांच्या आराखडयास तत्वत: मंजूरी दिली आहे. यासाठी आवश्यक नियव्यय उपलब्ध करण्यात येत आहे.

महसूल खात्याचे विशेष अभियान

५१. राज्यातील जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी शिबीरांच्या माध्यमातून विविध प्रकारचे ४५ लाखापेक्षा जास्त दाखले देण्यात आले आहेत. तसेच कुळ कायद्यांतर्गत मालकी हक्क प्राप्त होऊन १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या प्रकरणात विक्री परवानगीची अट काढून लाखो शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या व्यतिरिक्त शासनाने खंडकरी शेतकऱ्यांवरील अनेक वर्षांचा अन्याय दूर करुन ३ हजार ६५२ खंडकरी शेतकऱ्यांना २६ हजार एकर क्षेत्र उपलब्ध करुन दिले आहे.

नैसर्गिक आपत्ती निवारण

५२. राज्यातील जनतेला टंचाई, अतिवृष्टी, पूर, गारपीट आणि तत्सम नैसर्गिक आपत्तीत मदत करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिला आहे, हे आपणास माहित आहेच. या वर्षीदेखील नैसर्गिक आपत्तींवर मात करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. गेल्या रब्बी हंगामात ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ४ हजार ५०० रुपयांप्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला आहे.

५२.१ राज्यात २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुराच्या नैसर्गिक आपत्तींत बळी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी २ लाख ५० हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. मृत झालेल्या मोठया जनावरांच्या मालकांना २५ हजार रुपये आणि लहान जनावरांच्या मालकांना ५ हजार रुपये मदत दिली आहे. पडझड झालेल्या घरांच्या वर्गवारीनुसार १५ हजार ते ७० हजार रुपयांपर्यंत मदत देण्यात आली आहे. पिकांच्या नुकसानीसाठीदेखील मदत वितरित करण्यात आली आहे. धान पिकांसाठी ७ हजार ५०० रुपये प्रतिहेक्टर, इतर पिकांसाठी ५ हजार रुपये प्रतिहेक्टर, बहुवार्षिक पिकांसाठी १२ हजार रुपये प्रतिहेक्टर, खरडून गेलेल्या जमिनीसाठी २० हजार रुपये आणि वाहून गेलेल्या जमिनीसाठी प्रतिहेक्टर २५ हजार रुपये देण्यात आले आहेत.

५२.२ बोटी, जाळी आणि मत्स्यबीजांच्या नुकसानीपोटी मच्छिमार व्यावसायिकांना केंद्र शासनाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दरानुसार मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जीवनावश्यक अन्नधान्य व इतर वस्तुंवरील कर सवलत

५३. महाराष्ट्रामध्ये धान्य, डाळी, हळद, मिरची इत्यादी वस्तु पहिल्यापासूनच करमुक्त आहेत. मुल्यवर्धित कर लागू करताना झालेल्या राष्ट्रीय सहमतीप्रमाणे या वस्तुंवर कर लावणे आवश्यक होते. परंतु या वस्तु नित्योपयोगी असल्यामुळे मुल्यवर्धित कर पध्दतीमध्ये करमुक्तच ठेवल्या होत्या. करमाफीची मुदत ३१ मार्च २०१४ पर्यंत वाढविण्यात आली होती. याचा विचार करुन गहु, तांदुळ, डाळी,

त्यांचे पीठ, गुळ, हळद, चिंच, धणे, मेथी, मिरची, सुवा, नारळ, पापड, ओले खजूर, सोलापुरी चादर, टॉवेल, मनुका व बेदाणे, या वस्तुंवरील करमाफी आणि चहावरील सध्याची करसवलत ३१ मार्च २०१५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**जिल्हा वार्षिक योजना**

५४. शासनाच्या धोरणांची आणि विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक; तसेच कालबध्द पध्दतीने होण्यासाठी जिल्हा योजनेच्या नियतव्ययात शासनाने भरीव वाढ केली आहे. त्याचबरोबर प्रशासकीय मान्यता आणि निधी वितरणाची पद्धत सुलभ केली आहे. त्याचे उत्कृष्ट परिणाम दिसून आले आहेत.

५४.१ सन २०१४-१५ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेसाठी ५ हजार ९०२ कोटी रुपये इतका नियतव्यय राज्यस्तरीय बैठकीत अंतिम करण्यात आला आहे.

**राज्य वार्षिक योजना**

५५. सन २०१४-१५ च्या वार्षिक योजनेसंदर्भात अद्याप योजना आयोगाशी अंतिम चर्चा झालेली नाही. तथापि, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या वर्षाच्या राज्य योजनेचे आकारमान ५१ हजार २२२ कोटी ५४ लाख रुपये निश्चित करण्यात आले आहे. या आकारमानाच्या ११.८ टक्क्यांप्रमाणे ६ हजार ४४ कोटी २६ लाख रुपये अनुसूचित जाती उपयोजनेसाठी आणि ९.४ टक्के प्रमाणे ४ हजार ८१४ कोटी ९२ लाख रुपये नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

५५.१ केंद्र शासनाने नुकत्याच सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात केंद्रीय योजनांच्या निधी वितरणाच्या पध्दतीत मोठे बदल केले आहेत. त्यानुसार केंद्र शासनाकडून निमशासकीय संस्थांना होणारे थेट अनुदान वाटप आता राज्याच्या अर्थसंकल्पीय तरतूदीद्वारे देण्यात येणार आहे. या अनुदानाचा समावेश राज्याच्या वार्षिक योजना आराखड्यास राज्य योजनेस केंद्राचे सहाय्य म्हणून केला आहे. त्याबाबतच्या आवश्यक तरतुदी मी आगामी अतिरिक्त अर्थसंकल्पात नवीन बाबींद्वारे सादर करीन.

५५.२ राज्याची प्रस्तावित 'प्रारुप योजना' योजना आयोग, नवी दिल्ली यांना पाठविण्यात येत आहे. त्यांच्या मंजुरीनंतर वार्षिक योजनेचे अंतिम आकारमान निश्चित होईल.

अर्थसंकल्पीय अंदाज २०१४-१५

५६. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा १ लाख ६९ हजार ९०७ कोटी ५५ लाख रुपये व महसुली खर्च १ लाख ७५ हजार ३२४ कोटी ८३ लाख रुपये अंदाजित केलेला आहे. महसूली तूट ५ हजार ४१७ कोटी २८ लाख इतकी राहील.

५६.१ सन २०१३-१४ च्या सुरवातीस महसुली अधिक्य अल्प प्रमाणात अपेक्षित होते. तथापि, महसुली जमांचे उद्दीष्ट गाठले असले तरी, वीज दरात सवलत, टंचाई निवारणासाठी करण्यात आलेला खर्च, इत्यादीसाठी अतिरिक्त देणी द्यावी लागली. परिणामी सुरवातीस अपेक्षित महसुली अधिक्याचे रुपांतर ३ हजार १७ कोटी २३ लाखाच्या तुटीत झाले आहे. त्याचप्रमाणे चालू वर्षी शासनाने घेतलेले काही निर्णय जसे की वीज दर सवलतीत मोठी वाढ इत्यादीमुळे महसुली खर्चात नियमीत वाढीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. परिणामी सन २०१४-१५ मध्ये सुध्दा महसुली तूट झाल्याचे दिसून येते. २०१२-१३ या वर्षी महसुली अधिक्य टिकवून ठेवले असले तरी, सध्या अर्थव्यवस्थेत आलेला संथपणा व अपरिहार्यपणे लोकोपयोगी मागण्यांचा स्वीकार करावा लागल्याने तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे.

५६.२ तरी सुध्दा महसुली वाढीचे अधिक प्रयत्न करुन व अनावश्यक खर्च कमी करुन ही तूट कमी करण्यात मी यशस्वी होईन, असा मला रास्त विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!